संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लाडकी बहीण योजनेतील जुमलेबाजी

राज्यात पुन्हा लाडकी बहीण योजनेवरून आरोप प्रत्यारोप दावे प्रतिदावे सुरू झालेले आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अर्थातच राजकीय हेतू डोळ्यासमोर ठेवून लाडकी बहीण योजना घाईघाईने लागू झाली होती. आज वर्ष-दीड वर्षानंतर सरकारला या योजनेतल्या काही त्रुटी लक्षात आल्या. त्रुटी म्हणण्यापेक्षाही लाडक्या बहिणींच्या नावाने नको ते लाडके लोक सरकारी पैसा ओरबाडत असल्याचे स्पष्ट झाले. त्यातली धक्कादायक बाब म्हणजे लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये पाच हजार सरकारी कर्मचारी असल्याचे आढळून आले आहे. शिवाय बहिणींच्या नावाने १४ हजार पुरुषांनी लाडक्या बहिणींच्या तिजोरीतून हातसफाई केल्याचेच चित्र समोर येते आहे. सुरूवातीच्या काळात जवळपास अडीच कोटींच्या आसपास लाडक्या बहिणींना पैशांचे वाटप केले गेले. मात्र ज्यावेळेला राज्याच्या महालेखापालांकडून या योजनेसंदर्भात तपशीलवार माहिती मागायला सुरूवात झाली. तेव्हा सरकारचे धाबे दणाणले. कारण बहिणींच्या नावाने सरकारी पैशांचा नको ते लोक गैरफायदा घेत असल्याचे समोर येऊ लागले होते. सुरूवातीच्या काळात महिलांनी आपण देत असलेली माहिती खरी आहे अशा प्रकारचे पत्र सरकारला द्यायचे होते. ते दिल्यानंतर त्या लाडक्या बहिणींना दर महिन्याला योग्य त्या निधीचे वाटपही झाले मात्र हे पैसे घेणारे सगळ्या पात्र अशा महिलांनाही याचीही माहिती समोर येऊ लागली. म्हणून सरकारने सर्वांना केवायसी करण्याची सक्ती केली. केवायसी करत असताना आवश्यक असलेल्या कागदांची पूर्तता करावी लागते. त्या कागदपत्रांची किंवा आवश्यक त्या पुराव्यांची पूर्तता अनेक महिला करू शकल्या नाहीत. स्वाभाविकपणे अशा महिलांचे अनुदान बंद झाले. अपात्र अशा ज्या महिलांना पैसे दिले गेले. त्यांच्याकडून हे पैसे वसूल करण्याचा सरकारचा विचार दिसत नाही. मात्र ज्या पुरुषांनी या योजनेचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेतला त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे.

### बदमाशी करणाऱ्यांची मजा

एकूणच या योजनेचे उद्दीष्ट लक्षात घेतले तर त्यालाच हरताळ फासण्याचे काम सरकारकडून आणि काही बोगस लाडक्या बहिणींकडून झालेले दिसते. बोगस याचा अर्थ असा की, पात्रता नसतानादेखील या योजनेसाठी अर्ज केले गेले. म्हणजे ज्यांच्याकडे चारचाकी वाहने आहेत. ज्या महिला इन्कम टॅक्स भरतात अशांनी देखील सरकारी योजना आहे. फायदा मिळवून घ्या अशा प्रवृत्तीतून अर्ज केले गेले. सरकारी योजना म्हटल्यावर कोणीही काही बघणार नाही. सरकारी कारभारामध्ये अनेक गैरकारभार मॅनेज करता येतात. आपण केलेला अर्ज कोणाच्या लक्षात येणार नाही अशा समजुतीत अनेकजण होते. परंतु सरकारलाच अर्थखात्याकडून वारंवार दट्ट्या मिळत गेला. खरे तर यातले आणखी एक महत्त्वाचे कारण असे आहे की लाडकी बहीण योजनेवर दर महिन्याला होणारा जवळपास ३ हजार ६०० कोटींचा खर्च सरकारच्या आवाक्याबाहेर जाऊ लागला होता. कारण केवळ राजकीय फायदा डोळ्यासमोर ठेऊन योजना सुरू केली त्याचा राज्याच्या तिजोरीवर किती ताण पडेल याचा पुरेसा विचारच झाला नाही. परिणामी या योजनेचे भवितव्यही धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली होती. हा खर्च कमी करण्याच्या दिशेनेच सरकारची पावले पडत गेली आणि त्यातून आता जवळपास ८० लाख अपात्र महिलांची नावे समोर आलेली आहेत. म्हणजे दर महिन्याला होणाऱ्या एकूण खर्चाच्या जवळपास पंचवीस टक्के रक्कम खिरापतीसारखी वाटली गेली. गैरफायदा घेणाऱ्यांची नावे वगळल्यानंतर सरकारचे जवळपास पाचशे कोटी दर महिन्याला वाचण्याची शक्यता आहे. तिजोरीवर पडणारा भार लक्षात घेऊन अन्य खात्यांचे निधीदेखील या योजनेकडे वळवले जात होते. भविष्यात तर केंद्र सरकारकडून या योजनेसाठी पैसे मागण्याची वेळ येणार होती. याचा अर्थ योजनेचा उद्देश कितीही चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी करताना सरकारी पातळीवर कसा धिंगाणा घातला जातो याचा हा नमुना म्हणता येईल. गेली दीड वर्ष लाखो महिलांना त्याचा फायदा होतो आहे. मात्र सरकारच्या या नव्या भूमिकेमुळे काही पात्र महिलादेखील त्यात भरडल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### वर्षाला ४३ हजार कोटी

मुख्यमंत्र्यांनी ही लाडकी बहीण योजना बदनाम होण्याची बरीच मोठी कारणे सांगितली. त्यातली बदमाशी शोधून काढण्याचा आता जरी प्रयत्न होत असला तरी काही महिने तो खपवून घेतला गेला किंबहुना काही सरकारी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेसुद्धा अपात्र लोकांनीदेखील त्याचा फायदा उठवला. तेव्हा बदमाशी करणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांचीदेखील झाडाझडती होणे गरजेचे ठरते. ज्या उत्साहाने ही योजना सुरू झाली. त्यावेळेला सरकार महिलांच्या बाबतीत किती उदार आहे हे दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. परंतु आता या योजनेला गैरकारभाराचे चटके बसू लागले आणि त्याचे फटके अनेक लाडक्या बहिणींनाही सोसावे लागत आहेत. योजना कितीही चांगली असली तरी ती एकदा सरकारी योजना म्हटल्यावर गैरफायदा घेणारेदेखील तितकेच जागरुक असतात. पहिल्या वर्षातच या योजनेचा खर्च ४३ हजार कोटींवर गेल्याचे समोर आलेले आहे. म्हणजे यातले काही हजार कोटी हे अपात्र लोकांच्या खिशात गेले असे म्हणायला हरकत नाही. पुढची निवडणूक येईपर्यंत ही योजना सरकारला चालू ठेवावी लागेलच. शिवाय निवडणुकीपूर्वी पुन्हा या योजनेसाठी काही नवीन जुमलेबाजी होण्याची शक्यता आहे. देशात अनेक राज्यांमध्ये अशा प्रकारची योजना राबवली जाते. परंतु या योजनेचा फायदा घेणाऱ्यांची संख्या ही महाराष्ट्रात आहे. यातच या योजनेचे यश जरी दडलेले असले तरी ही योजना अपयशी होण्याचीही शक्यता त्यातच दडलेली असल्याचे स्पष्ट होते.